# “माहिती अधिकार एक सामाजिक जाणीव जागृती काळाची गरज”

**डॉ.दीपक डी.कोटुरवार** मार्गदर्शक भाऊसाहेब भोंरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभूळगाव जि.यवतमाळ

**राजकुमार रामरावजी वाघ** संशोधक विद्यार्थी भाऊसाहेब भोंरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभूळगाव जि.यवतमाळ

Mobile-9765858001Email-rajwagh246@gmail.com

---

**सारांश (ABSTRACT):-**

भारतातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाच्या उपलब्धीसाठी 'माहितीचा अधिकार अधिनियम-२००५' हा कायदा तयार करण्यात आला. भारतीय संविधानातील कलम- १९ मधील विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्यात माहितीचा अधिकार पूर्वीच अंतर्भूत होता. सर्वोच्च न्यायालयांना विविध निर्णयांच्या माध्यमातून याला पुष्टी दिली आहे. माहितीचा अधिकार पारदर्शी शासन व पारदर्शी कारभार याकरिता निर्माण झाला असला तरी त्याचा दुरुपयोगही होत आहे. अर्थात माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीत विविध समस्या आहेत. माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था व जनता यांनी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरच सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात पारदर्शी कारभार निर्माण होईल.

माहितीच्या अधिकाराबाबत पाहिजे तेवढी जनजागृती नाही. वास्तविक, हे काम सरकारचे आहे; पण सरकारकडे इच्छाशक्तीचा अभाव आहे. दरवर्षी सरकारी पातळीवर आदेश निघतो; पण माहिती अधिकार दिन केवळ कागदोपत्री साजरा होत असून, जनजागृती करण्यात सरकार अपयशी ठरत आहे. गेले दोन दशकभर माहितीचा कायदा अस्तिवात असूनही त्याचा परिणामकारक वापर होताना दिसून येत नाही. समाजातील सर्व स्तरांमध्ये या अधिकाराचा परिणामकारक वापर झाल्यास, माहिती अधिकाराच्या जाणीव जागृतीमुळे सुदृढ आणि सशक्त लोकशाही अस्तिवात येण्यासाठी मदत होईल.

**बीजशब्द ( KEYWORDS ):-**

माहिती, अधिकार ,जागृती, जाणीव, भ्रष्टाचार, सामाजिक, कायदा, नागरिक, पारदर्शकता, प्रशासन, स्वातंत्र्य, मानवी हक्क.

**प्रस्तावना :-**

माहितीचा अधिकार म्हणजे सरकारकडून माहिती मागवण्याचे लोकांचे स्वातंत्र्य होय. भारतात ‘माहिती कायदा’ ११ मे २००५ मध्ये केंद्र सरकारने मंजूर केला. १२ ऑक्टोबर २००५ पासून हा कायदा अंमलात आला. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला भाषण आणि विचार स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्काचाच भाग म्हणजे माहितीचा अधिकार होय.

एक जबाबदार नागरिक म्हणून आपले अधिकार आणि कर्तव्ये ओळखणे आणि त्यांचा वापर करणे या क्षमतादेखील सामाजिक जाणिव जागृतीत समाविष्ट असतात. सामाजिक जाणीव जागृती या क्षमतेत स्थानिक आणि जागतिक पर्यावरणातील घटकांबद्दल संवेदनशील असणे, सामाजिक प्रश्नांविषयी जागरुक राहून ते सोडविणे, विशेषत: असुरक्षित लोकसंख्येतील घटक यांच्या अधिकाराविषयी आदर दर्शविणे आणि त्यांचे अधिकार सुरक्षित ठेवणे या सारख्या सामाजिक स्वास्थ्याच्या घटकांसाठी एकत्रितपणे योगदान करण्याचा समावेश होतो.

माहितीचा अधिकार हा व्यक्तीचा नैसर्गिक, मानवी आणि मूलभूत अधिकार आहे. या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा असल्यामुळे त्यात साध्या कायद्याप्रमाणे बदल किंवा सुधारणा सरकारला करता येत नाहीत. तसेच मूलभूत अधिकाराचा दर्जा या अधिकाराला असल्यामुळे हा अधिकार साध्या कायद्याप्रमाणे काढून घेतला जाऊ शकत नाही.

माहिती अधिकार एक सामाजिक जाणीव जागृती काळाची गरज हे समजावून घेण्यासाठी पुढील मुद्दे पाहू या. ब्रिटिश काळापासून प्रशासनात ‘कार्यालयीन गुप्ततेचा’ कायदा अस्तित्वात होता. त्यामुळे सर्व प्रशासकीय व्यवहारांना संरक्षण मिळत असे. मात्र, आता अंमलात असलेल्या माहितीच्या अधिकारामुळे नागरिकांकडून मागणी केलेली माहिती द्यावीच लागणार आहे. त्यामुळेच प्रशासनात खुलेपणा आणि पारदर्शकता येऊ शकेल.

भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी माहितीचा अधिकार हे एक प्रभावी अस्त्र आहे. सनदी नोकरांना आपली कृती, कार्ये केव्हाही सार्वजनिक होऊ शकेल आणि जनतेला आपल्याला जाब द्यावा लागेल याचे भान ठेवावे लागेल. सामाजिक जाणीव बाळगणाऱ्या व्यक्ती तसेच संघटनांना आपल्या विभागात कोणत्या योजना कशा प्रकारे राबविल्या जात आहेत याची माहिती उपलब्ध झाल्यामुळे पारदर्शी, लोकाभिमुख, जबाबदार, कार्यक्षम प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने मदत होईल.

माहितीचा अधिकार कसा वापरावा यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मार्गदर्शन करण्याची गरज आहे. तसेच या अधिकाराची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी सरकारी यंत्रणेत काम करणाऱ्यांनाही प्राशिक्षण देण्याची गरज आहे. समाजातील सर्व स्तरांमध्ये या अधिकाराचा परिणामकारक वापर होण्यासाठी व सुदृढ आणि सशक्त लोकशाही अस्तित्वात येण्यासाठी माहिती अधिकार एक सामाजिक जाणीव जागृती काळाची गरज बनलेली आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१) माहिती अधिकाराची व या कायद्याची नागरिकामध्ये जाणीव जागृती करणे.

२) नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे.

३) शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणने,

४) भ्रष्टाचार कमी करून राज्यकारभार जनताभिमुख करणे .

५) माहिती अधिकाराचा वापर कसा करावा याचे नागरिकांना ज्ञान देणे.

जनतेची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याविषयी सामाजिक जाणीव जागृती काळाची गरज बनली आहेत. प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही हे सर्वसामान्य व्यक्ती पाहू शकणार आहे एखादी व्यक्ती जी माहिती मागेल त्याला ती माहिती ठराविक कालावधीत देण्याचे या कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधन असल्यामुळे शासकीय त्यामुळे हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.या कायद्याची जाणीव जागृती करणे हेच शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहेत.

**शोधनिबंधपूर्व साहित्याचा आढावा :-**

प्रस्तुत शोधनिबंध लिखाणासाठी अभ्यासकाने विविध ग्रंथालयातील माहिती अधिकार आणि संशोधन पद्धती या संदर्भात असलेली प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथाचे वाचन केले त्यामधून जी माहिती प्राप्त झाली त्या आधारे तथ्य संकलित करून त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे तसेच माहिती अधिकाराच्या संदर्भात शासकीय कागदपत्रे जी उपलब्ध झाली त्याचबरोबर माहिती अधिकाराच्या संदर्भात यापूर्वी विविध विषयाचे जे प्रबंध विविध संशोधकाने सादर केले आहे त्याचे वाचन करून त्यामध्ये काही तथ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन क्षेत्र :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आर्वी मतदार संघातील बाजारवाडा, खूबगाव, धनोडी, टाकरखेड या ४ ( चार ) ग्रामपंचायतच्या अंतर्गत येणाऱ्या नागरिकांमध्ये माहिती अधिकाराच्या संदर्भात असलेली सामाजिक जाणीव जागृती याविषयीचे विश्लेषण करण्यासाठी क्षेत्राची निवड करण्यात आली.

**गृहीतके :-**

१) सर्वसामान्य नागरिकांना माहिती अधिकाराविषयी परिपूर्ण माहिती नाही.

२) ग्रामीण भागात अजूनही लोक माहिती अधिकाराबद्दल अनभिज्ञ आहेत.

३) माहिती अधिकाराचा कसा व कशासाठी उपयोग करावा याची जाणीव नागरिकांना नसल्याचे दिसून येते.

४) माहिती अधिकाराची शासनाने जागृती केली नाही.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोधनिबंधातील संशोधन विषयासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.आर्वी मतदार संघातील ०४ ग्रामपंचायतमधील नागरिकांकडून माहिती अधिकाराविषयी असलेली जाणीव जागृती याविषयीची माहिती संकलित करण्यासाठी नमुना निवड पद्धत वापरण्यात आली. चार गावामधील हेतुपुरस्सर एकुक ४० लोक निवडण्यात आले.त्यानुसार प्रत्येकी १० नागरिक असे मिळून ४० नागरिक यांची या कायद्याबाबतची मते एका संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली. त्या अनुषंगाने जी काही तथ्ये प्राप्त झाली,उत्तरादाखल त्यांच्याकडून जी काही मतमतांतरे व्यक्त झाली त्याव्दारे प्राप्त तथ्याचे संकलन करण्यात आले.

**माहितीचे विश्लेषण :-**

माहिती अधिकाराच्या संदर्भात खरोखरच नागरिकांत जागृती निर्माण झाली आहे काय? नागरिक माहिती अधिकाराचा वापर करत आहे. काय ? प्रशासन माहिती अधिकाराविषयी जागृती करीत आहे काय ? प्रशासन माहिती अधिकाराविषयी जनतेप्रती जबाबदार बनले आहे काय ? माहिती अधिकार कायदा कोणत्या उद्देशाने करण्यात आला ? अशा विविध प्रश्नांचा समावेश प्रश्नावली मध्ये करण्यात आला.

माहितीचा अधिकाराची सामाजिक जाणीव जागृती समजून घेण्यासाठी संशोधनाचे परिक्षेत्र आर्वी तालुक्यातील ०४ ग्रामपंचायत इतके मर्यादित ठेवले आहे.त्या अनुषंगाने या चार गावामधील प्रत्येकी १० नागरिक असे मिळून ४० नागरिक यांची या कायद्याबाबतची मते एका संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार उत्तरदात्यांकडून जी माहिती प्राप्त झाली त्याचे सविस्तर विश्लेषण खालील तक्त्यात करण्यात आले आहे.

| क्र | प्रश्नाचे स्वरूप | बाजारवाडा | खुबगाव | धनोडी | टाकरखेड | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागरिकांत जागृती | ५ | ५ | ५ | ५ | ५०% |
| २ | अधिकाराचा वापर | ४ | ४ | ६ | ४ | ४५% |
| ३ | शासन जबाबदार | ४ | ६ | ४ | ५ | ४८% |
| ४ | मा.अधिकार उद्देश | ६ | ४ | ६ | ६ | ५५% |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनात येते की, माहिती अधिकाराची जागरूकता केवळ ५०% लोकांमध्ये आहे अजूनही ५०% नागरिक या कायद्याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते माहिती अधिकाराचा वापर प्रत्यक्षात ४५% लोक करीत आहे माहिती अधिकारात तळागाळात पोहोचवण्यासाठी शासन उदासीन असल्यामुळे केवळ ४८% लोकांपर्यंतच हा कायदा पोहोचला आहे या कायद्याचा उद्देश केवळ ५५% लोकांना माहीत आहे माहिती अधिकाराची सामाजिक जाणीव जागृतीचे प्रमाण वरील प्रकारच्या विश्लेषणात्मक तक्त्यातून दिसून येते.

**माहिती अधिकार एक सामाजिक जाणीव जागृती समस्या व उपाय:-**

**समस्या :-**

माहितीचा अधिकार सध्या बऱ्याच प्रमाणात लालफितीत अडकला आहे. त्यातूनच पळवाटा काढण्यात पटाईत असलेल्या नोकरशाहीतील कारकुनी करामतींमुळे माहितीचा अधिकार कायद्याची सध्या थट्टा सुरू असून तो परिणामशून्य बनत आहे. राज्यात सुमारे अडीच लाख, तर देशपातळीवर १५ लाखांहून अधिक तक्रार अर्ज प्रलंबित राहणं, ही त्या कायद्याची क्रूर थट्टा असून त्यामुळे हा कायदा कुचकामी ठरत असल्याचं द्योतक आहे, अर्जात मागितल्यानुसार मुद्देसूद माहिती न देऊन वेळकाढूपणा करणं, अर्ज निकाली काढण्याऐवजी त्याचा 'निकाल' कसा लागेल हे पाहणं, गोपनीय माहितीची ढाल वापरून जबाबदारी झटकणं, तरतूदीत बसत नसल्याचं नमूद करणं, समाधान न झाल्यास ॲपीलेट अधिकाऱ्याकडे अपील करण्याची सूचना करणं, कागदी घोडे नाचवून उत्तरं देण्यास टाळाटाळ करणं, गेंड्याची कातडी पांघरून उत्तरं न देण्याचा निर्लज्जपणा करणं अशा अनेक तऱ्हेच्या कारकुनी करामतींमुळे या कायद्याची सध्या थट्टा सुरू आहे. नागरिकांमध्ये आपल्या अधिकार व कर्तव्याबाबत असणारी अनभिज्ञता ही ज्याप्रमाणे कायद्याच्या अंमलबजावणीत मोठा अडथळा ठरते, त्याप्रमाणे नागरिकांमध्ये असणारी जागृती ही कायद्याच्या यशस्वीतेसाठी पूरक ठरत असते.

**उपाय:-**

१) सार्वजनिक प्राधिकरणाने नागरिकांसाठी जास्तीत जास्त माहिती खुली करणे आवश्यक आहे.

२) 'लोकशाही दिन' सारखा महिन्यातून एक दिवस माहिती अधिकार दिन ठेवल्यास नागरिकांच्या दृष्टीने ते सोयीचे ठरेल.

३) प्रजासत्ताक भारताच्या ७५ वर्षांनंतर नागरिकांना कायद्याने मिळालेल्या या अधिकाराची कारकुनी करामतीमुळे पायपल्ली होऊन तो अधिकाधिक बोथट बनत आहे. त्यामुळे नोकरीतून निलंबन अथवा नोकरीतून बडतर्फ अशा तरतूदी करून कायदा अधिक कडक करव्यात.

४) माहिती न देण्याचा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्याला २५ हजार रुपये दंडाची शिक्षा पुरेशी नसून त्यामुळेच हा कायदा परिणामशून्य ठरत आहे. हा विषय ट्रिब्युनल कायद्याच्या अखत्यारीत आणावा,

५) कायद्याची बूज न राखणाऱ्या अधिकाऱ्यांना सक्तीची रजा, निलंबन, नोकरीतून बडतर्फ अशा शिक्षांची तरतूद करून हा कायदा अधिक कडक करावा, प्रशासनाने माहितीच्या अधिकारातील कलम चारची माहिती स्वयंप्रेरणेने दिल्यास माहिती अधिकारांच्या तक्रारींची संख्या कमी होईल. यासाठी शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयाकडील माहितीचे वर्गीकरण करुन ते सूचीबध्द करावे. कार्यालयाची माहिती वेबसाईटवर अथवा कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी. या कायद्यामुळे नागरिकांचा शासन कारभारातील सहभाग वाढत आहे.

माहितीचा अधिकारांतर्गत आलेल्या अर्जावर वेळेत माहिती देणे, ही संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. विहित मुदतीत माहिती न देणे, दिशाभुल करणे, अपूर्ण व असत्य माहिती देणे अशा गोष्टी शासकीय यंत्रणांनी

टाळाव्यात.अशा मागण्या अलीकडील काळात जोर धरत आहे माहिती अधिकाराच्या जाणीव जागृतीमुळे हे शक्य झाले ही खऱ्या अर्थाने वस्तुस्थिती आहे.

**निष्कर्ष :-**

१) आर्वी तालुक्यातील ग्रामपंचायतीअंतर्गत माहिती अधिकाराच्या प्रचार आणि प्रसार यंत्रणेमुळे नागरीकांमध्ये माहिती अधिकाराच्या संदर्भात काही प्रमाणात आवश्यक ती जाणीव जागृती झाली आहे.

२) माहिती अधिकार अधिनियम २००५च्या कायद्यामुळे नागरीकांना आपल्या कर्तव्याची, जबाबदारीची आणि अधिकाराची जाणीव होत आहे.

३) सर्वेक्षण केलेल्या नागरीकांपैकी ५०% नागरीक माहिती अधिकाराला प्रशासनात पारदर्शकता आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे माध्यम मानतात. याचा अर्थ माहिती अधिकार कायदयामुळे प्रशासनात पारदर्शकता येवून भ्रष्टाचाराला आळा बसत आहे.

४) नागरीक, ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासंबंधी माहिती अधिकाराचा अवलंब करीत असल्यामुळे नागरीकांचा प्रशासनात सहभाग वाढत आहे.

५) प्रस्तुत शोधनिबंधाच्या सर्वेक्षणाअंती निदर्शनास आले की आर्वी तालुक्यातील ४ ग्रामपंचायतीमधील माहिती अधिकाऱ्याकडून सहकार्य न मिळालेल्या नागरीकांची संख्या ५२% असल्यामुळे नागरीक आणि माहिती अधिकारी यांच्यात सहकार्यांचा अभाव दिसून येतो.

६) प्रस्तुत शोधनिबंधाकरीता नमुना म्हणून निवडण्यात आलेल्या व्यक्तीचे वर्गीकरण केले असता माहिती अधिकाराचा वापर शिक्षित लोक अधिक करीत आहेत असे निदर्शनात येते.

७) माहिती अधिकाऱ्यांना माहिती अधिकारी आणि कार्यालयीन इतर कामे करावी लागत असल्यामुळे त्यांच्यावर कामाचा मानसिक तान-तणाव निर्माण होत आहे.

८) नागरीकांना माहिती अधिकारामुळे सर्वांना समान न्याय आणि आपले कर्तव्य, अधिकार यासंबंधी जाणीव होत आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१) केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५, विवेकानंद प्रकाशन पुणे, डिसेंबर-२००६.

२) रिसर्च मेथडॉलॉजी - विरेंद्र प्रकाश शर्मा पंचशील प्रकाशन, जयपूर जानेवारी २०२१

३) जैन, प्रो. रमेश, गुर्जर नाथू लाल, सूचना का अधिकार अपेक्षाए और चुनौतियाँ, सबलाइम पब्लीकेशन्स, जयपूर-२००६. जयपूर-२००६

४) निगम, डॉ. शालू, सुचना का अधिकार कुछ सामाजिक व कानूनी पहलू, वै. दि. पिपल पब्लीकेशन्स,

५)खराट,डॉ.संभाजी,माहितीचा अधिकार,प्रतिमा प्रकाशन,पुणे २००७

६) माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, यशवंतराव चव्हाण ज्ञान प्रबोधिनी (यशदा), पुणे, डिसे.-२००६,

७) सोनवणे, जगतराव, सरकारी कर्मचारी आणि माहितीचा अधिकार, सोन दिपा पब्लीशर्स, धुळे-२००६.

८) कुरियन जैस्सी, सूचना का अधिकार- २००५, भारतीय सामाजिक संथान, नई दिल्ली-

९) कुळकर्णी, डॉ. डि.एस., माहितीचा अधिकार (कायदा, स्वरुप, उद्दीष्टे), मनोरमा प्रकाशन, मुंबई, मार्च-०८ ९) माहितीचा अधिकार-२००५, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन प्रकाशन, राळेगणसिद्धी (जि. अहमदनगर),

१०) शेलकर, डॉ. अभया, केंद्रीय माहितीचा अधिकार, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद-२००८. ११) फडके, य. दी., माहितीचा अधिकार, अक्षर प्रकाशन, मुंबई, ९ ऑगष्ट २००२.

११) मानवी हक्क व माहितीचा अधिकार -डॉ. संदीप काळे साईनाथ प्रकाशन ,नागपूर आवृत्ती जून २०१९